महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

सोमवार ■ २९ डिसेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १८३ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये




## महत्वाचे

### खा. नरेश म्हस्केंच्या सुपुत्राच्या उमेदवारीस विरोध?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे महापालिका निवडणुकीचे बिगुल वाजले असताना आता ठाण्यातच शिंदे गटातील वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या घराणेशाहीला विरोध होऊ लागला आहे. शिंदे गटाचे खासदार नरेश म्हस्के यांच्या मुलाला उमेदवारी देण्यास विरोध होऊ लागला असून शनिवारी रात्री येथील शिंदे गटाच्याच कार्यकर्त्यांनी येथील प्रमोद गोगावले यांना उमेद्वारी द्यावी अशी मागणी केली आहे. प्रमोद गोगावले हे भरत गोगावले यांचे कार्यकर्ते आहेत. काही दिवसांपूर्वीच माजी नगरसेवक संजय भोईर यांच्या भावाला उमेदवारीवरुन अशाचप्रकारे विरोध झाला होता. त्यामुळे आता शिंदे गटातील गटबाजी चव्हाट्यावर येत आहे. शिवसेना एकसंध असताना नरेश म्हस्के कोपरी येथील आनंदनगर भागातून नगरसेवक म्हणून निवडून येत होते. ठाण्याचे ते महापौर देखील होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांची साथ सोडल्यानंतर नरेश म्हस्के यांनी शिंदे यांच्यासोबत राहणे पसंत केले. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणूकीत त्यांनी ठाकरे गटाचे नेते राजन विचारे यांचा पराभव केला होता. नरेश म्हसेक हे खासदार झाल्याने येथील प्रभागातील जागा रिक्त झाली होती. नरेश म्हस्के यांचे पुत्र आशुतोष म्हस्के हे महापालिका निवडणुकीसाठी तयारी करत होते. नरेश म्हस्के खासदार झाल्याने इतर पदाधिकारी देखील उमेदवारी मिळेल या आशेवर होते. त्यामध्ये मंत्री भरत गोगावले यांचे कार्यकर्ते प्रमोद गोगावले यांचाही सामावेश होता. परंतु आता या प्रभागातून आशुतोष म्हस्के यांना उमेदवारी मिळण्याची चिन्ह निर्माण झाल्याने शिंदे गटातील पदाधिकाऱ्यांमध्ये अस्वस्थता पसरली आहे.

### निवडणुकीत शाई ऐवजी मार्कर?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीत मतदारांच्या डाव्या हाताच्या बोटावर पारंपरिक शाईऐवजी टिकणारी मार्कर खूण केली जाणार आहे. महापालिका निवडणूक विभागाने निवडणुकीची प्रक्रिया शांत, निर्भय आणि सुरळीत पार पडावी, यासाठी व्यापक तयारी सुरू केली आहे. ठाणे महानगरपालिकेतील ३३ प्रभागांमध्ये एकूण २,०१३ मतदान केंद्रे उभारण्यात येणार असून प्रत्येक केंद्रावर किमान दोन मार्कर पेन ठेवले जातील. ५ टक्के राखीव साठ्यासह सुमारे ४,५०० मार्कर पेनची जुळवाजुळव सुरू आहे. निवडणूक प्रक्रियेबाबत माहिती अशी, मतदाराची ओळख पटल्यावर मतदान केंद्रात प्रवेश दिला जातो. मतदानापूर्वी डाव्या हाताच्या तर्जनीवर मार्करची खूण केली जाते. ही खूण न पुसली जाणारी असल्यामुळे निवडणूक शांतीत आणि फसवणूक न करता पार पडते. डाव्या हाताची तर्जनी नसल्यास, इतर बोटावर खूण केली जाईल. यानंतर मतदाराची स्वाक्षरी किंवा अंगठा घेतला जातो आणि मतदान केंद्राध्यक्ष (पोलिंग अधिकारी) बोटावरील खूण तपासतात. ठाणे महानगरपालिकेची निवडणूक १५ जानेवारी रोजी होणार असून, महापालिका क्षेत्रातील एकूण १६,४९,८६७ मतदारांमध्ये ८,६३,८७८ पुरुष आणि ७,८५,८३० महिला मतदार आहेत. १३१ उमेदवारांसाठी ही निवडणूक पार पडणार असून, लोकशाहीचा हा उत्सव कोणत्याही अडथळ्याशिवाय पार पडावा, यासाठी महापालिका प्रशासनाने सर्व तयारी पूर्ण केली आहे.

### १० प्रभागांसाठी शिवसेनेत १६६ इच्छुकांच्या मुलाखती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण, ता. २८ (वार्ताहर) :** कल्याण पश्चिमेतील साई हॉल येथे शिंदे गटाच्या इच्छुक उमेदवाराच्या मुलाखती शिवसेना उपनेते प्रकाश पाटील, शिवसेना जिल्हा प्रमुख गोपाळ लांडगे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख राजेश कदम, पदाधिकारी सुनील चौधरी आदी शिष्टमंडळाने शनिवारी (ता. २७) घेतल्या. यावेळी १० प्रभागांसाठी १६६ इच्छुकांनी मुलाखती दिल्या. गोपाळ लांडगे यांनी सांगितले की, कल्याण डोंबिवली पालिका निवडणूक या अनुषंगाने प्रत्येक पक्ष आपल्या पक्षातील इच्छुक उमेवारांच्या मुलखती घेत असतात. त्या मुलाखतीमधून जे निवडून येण्यासाठी योग्य असतात त्यांना निवडण्याचे काम सोपे होते. कल्याण पश्चिमेत १० पॅनल असून १६६ इच्छुकांनी अर्ज भरले होते. त्यांच्या मुलाखत माध्यमातून, इच्छुकांचा आत्मविश्वास आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून झालेले काम पाहता शिवसेनेचे जास्त उमेदवार निवडून येतील, असे सांगितले.

## भिवंडी महापालिकेत भाजप-सपाची प्रतिष्ठा पणाला

### पालिका निवडणुकीत भाजपा आणि सपाच्या दोन्ही आमदारांची कसोटी




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी, ता. २८ (वार्ताहर) :** भिवंडी महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका आठ वर्षांनंतर होत आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भिवंडी पूर्व व पश्चिम विधानसभा मतदारसंघात समाजवादी पक्ष आणि भाजपच्या प्रतिष्ठेची लढाई रंगण्याची चिन्हे आहेत. दरम्यान या कालावधीत २०१९ व २०२४ अशा दोन विधानसभा निवडणुका पार पडल्या. भिवंडी पूर्वमध्ये समाजवादी पक्षाचे आमदार रईस शेख, तर भिवंडी पश्चिममध्ये भाजपचे आमदार महेश चौघुले यांनी आपला गड कायम राखला आहे. भिवंडी महापालिकेच्या २०१७ मधील निवडणुकीत काँग्रेसने राज्यात प्रतिकूल वातावरण असतानाही भिवंडीत उल्लेखनीय यश मिळवले होते. त्या वेळी भिवंडी पूर्व विधानसभा क्षेत्रात ४९, तर भिवंडी पश्चिममध्ये ४१ नगरसेवक होते. भिवंडी पूर्वमध्ये काँग्रेसचे २४, भाजपचे ९, शिवसेनेचे आठ, आरपीआय (एकतावादी) चार, समाजवादी पक्षाचे दोन आणि दोन अपक्ष नगरसेवक होते. भिवंडी पश्चिममध्ये काँग्रेसचे २३, भाजपचे १०, शिवसेनेचे चार आणि कोणार्क विकास आघाडीचे चार नगरसेवक होते. त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकांत धार्मिक मतांचे ध्रुवीकरण झाल्याने पूर्वमध्ये समाजवादी पक्ष, तर पश्चिममध्ये भाजप विजयी झाली. मात्र, महापालिका निवडणुकीत पक्षापेक्षा उमेदवाराचा स्थानिक जनसंपर्क, कामाचा अनुभव आणि मतदारांशी असलेला संवाद अधिक निर्णायक ठरतो. त्यामुळे या निवडणुकीत दोन्ही आमदारांची कसोटी लागणार आहे. एकूणच, भिवंडी महापालिका निवडणुकीनिमित्त आमदार रईस शेख आणि आमदार महेश चौघुले या दोघांचीही राजकीय प्रतिष्ठा पणाला लागली आहे.

#### भाजपपुढे काँग्रेस आणि सपाचे आव्हान

**● भाजप आमदार महेश चौघुले यांच्यावर संपूर्ण पालिका निवडणुकीची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. त्यामुळे ते ताकदीने मैदानात उतरले असले, तरी उमेदवारी वाटपामुळे पक्षांतर्गत नाराजी वाढण्याची शक्यता आहे. याच पार्श्वभूमीवर काँग्रेस या भागात आपली ताकद पुन्हा उभी करण्याचा प्रयत्न करीत असल्याने भाजपपुढे आव्हान उभे ठाकले आहे. दुसरीकडे भिवंडी पूर्वमध्ये समाजवादी पक्षाची संघटनात्मक ताकद अधिक आहे. आमदार रईस शेख आणि सपचे प्रदेशाध्यक्ष अबू आझमी यांच्यातील काही वर्षातील मतभेद पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवळल्याने पक्ष पुन्हा एकत्रित होताना दिसत आहे. काँग्रेसमधील बंडखोर अपात्र नगरसेवक राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) मध्ये दाखल झाले होते. मात्र, त्यापैकी बहुतांश माजी नगरसेवकांनी समाजवादी पक्षाची वाट धरल्याने त्यांची स्थिती मजबूत झाली आहे. यात काँग्रेसची अडचण वाढल्याचे चित्र आहे.**




### एबी अर्ज मिळत नसल्याने

## नवी मुंबईत अनेक उमेदवारांची घालमेल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** महापालिका निवडणुकीसाठी महाविकास आघाडी आणि महायुतीमधील घटक पक्षांच्या जागावाटपाचे सूत्र अद्याप ठरले नाही. अशावेळी बंडखोरी होऊ नये, म्हणून कोणत्याच पक्षाने त्यांच्या उमेदवारांना एबी अर्जाचे वाटप केले नाही. परिणामी, निवडणूक विभागाकडे राजकीय पक्षाच्या एकाही उमेदवाराचा अर्ज दाखल झाला नाही.

१५ जानेवारीला नवी मुंबई महापालिका निवडणूक होणार आहे. त्याकरिता उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी २१ डिसेंबरपासून मुदत देण्यात आली आहे. मंगळवार (ता. ३०) पर्यंत उमेदवारांना अर्ज दाखल करता येणार आहेत; मात्र महाविकास आघाडी आणि महायुतीमधील मित्र पक्षांचे जागावाटपाचे समीकरण ठरत नसल्याने इच्छुक उमेदवारांचे एबी अर्ज सर्वच पक्षांनी अडवून धरले आहेत. महायुतीमध्ये शिवसेना शिंदे गट आणि भाजपच्या स्थानिक नेत्यांचे जागावाटपाच्या चर्चा निष्फळ ठरल्या आहेत.

भाजपने शिंदे गटाला फक्त २० जागा देऊ केल्या आहेत. या उलट शिंदे गटाकडून ५७ जागा भाजपकडे मागितल्या आहेत. तसेच महापौर आणि स्थायी समिती या महत्त्वाच्या पदांवर चर्चा झालेली नाही. दोन्ही पक्षांमध्ये जागांवरून मतभेद असल्याने महायुतीचा निर्णय गुलदस्त्यात राहिला आहे. यादरम्यान ज्या जागा निश्चित झाल्या नाहीत, त्याठिकाणी एबी अर्ज दिल्यास बंडखोरी होण्याची भीती पक्षातील वरिष्ठांना आहे.

भाजप आणि शिंदे गटात अनेक ठिकाणी इच्छुकांची संख्या अधिक आहे. अनेक नगरसेवकांच्या पक्ष प्रवेशामुळे पक्षातील निष्ठावंत कार्यकर्त्यांवर अन्याय होण्याची दाट शक्यता आहे. महाविकास आघाडीत या उलट परिस्थिती असली तरी काही निवडक जागांवर काँग्रेस आणि ठाकरे गटाचे उमेदवार ठरत नाही. त्यामुळे काँग्रेस आणि ठाकरे गटाच्या स्थानिक नेत्यांनी इच्छुक उमेदवारांचे एबी अर्ज अडवून धरले आहेत. या सगळ्या नेत्यांच्या घरी आणि कार्यालयात जाऊन एबी अर्ज पदरात पडून घेण्यासाठी उमेदवार गर्दी करीत आहेत; परंतु अर्ज भरण्यासाठी एबी अर्ज मिळत नसल्याने अनेक उमेदवारांची घालमेल सुरू आहे.

#### बंडखोरीची भीती

**शिवसेना शिंदे गट आणि भाजप या पक्षाच्या प्रदेश पातळीवरील नेत्यांनी कोणत्याही परिस्थितीत युती करण्याचे आदेश नवी मुंबईतील स्थानिक नेत्यांना दिले आहेत; मात्र स्थानिक पातळीवर दोन्ही पक्षांतील माजी नगरसेवक आणि पदाधिकारी युती करण्यास इच्छुक नाहीत. युती झाल्यास दोन्ही पक्षांत बंडखोरी होण्याची दाट शक्यता आहे.**

### उल्हासनगर महापालिका निवडणुकीत

## 'महायुती' तील 'गुंतागुंती' चर्चेत !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :** उल्हासनगर महापालिका निवडणुकीच्या तोंडावर 'महायुती'चा विषय जितका चर्चेत आहे, तितकाच तो अधिक गुंतागुंतीचा होत चालला आहे. एका बाजूला शिवसेना-टीओके-साई यांची स्थानिक युती भक्कम होत असताना, दुसऱ्या बाजूला भाजपच्या प्रवेशामुळे ७८ जागांच्या गणितात मोठा राजकीय पेच निर्माण होण्याची चिन्हे स्पष्ट दिसू लागली आहेत. जागावाटप, संख्याबळ आणि संभाव्य बंडखोरी या तिन्ही आघाड्यांवर महायुतीसमोर आव्हाने उभी ठाकली आहेत. उल्हासनगर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीचे गणित दिवसेंदिवस अधिक क्लिष्ट होत आहे. शहरात आधीच शिवसेना, टीओके आणि साई या स्थानिक घटक पक्षांची युती झालेली असून, या आघाडीने अधिकाधिक जागांवर ठाम दावा केला आहे. अशा परिस्थितीत या युतीत भाजपचा समावेश झाल्यास जागावाटप करताना सर्वच पक्षांसमोर कठीण निर्णय घ्यावे लागणार आहेत. एकूण ७८ जागांच्या महापालिकेत सध्या शिवसेना-टीओके-साई युतीकडे तब्बल ५८ विद्यमान नगरसेवकांचे संख्याबळ असल्याचा दावा आहे. याशिवाय भाजपचे चार विद्यमान नगरसेवकही शिवसेना-टीओके गटात सहभागी झाल्याची माहिती आहे. त्यामुळे भाजपसाठी अवघ्या १६ जागा शिल्लक राहण्याची शक्यता असून, हे गणित भाजपला मान्य होण्याची शक्यता कमी असल्याचे चित्र आहे. या भूमिकेमुळे स्थानिक घटक पक्ष आणि भाजप यांच्यातील तणाव अधिक वाढण्याची शक्यता आहे. एकीकडे संख्याबळाच्या आधारे स्थानिक युती अधिक जागांवर ठाम आहे, तर दुसरीकडे भाजप संघटनशक्ती आणि टक्केवारीच्या मागणीवर अडून बसल्याचे दिसत आहे. परिणामी, उल्हासनगरमधील महायुतीचा निर्णय हा केवळ औपचारिक न राहता, आगामी निवडणूक रणनीती ठरवणारा निर्णायक टप्पा ठरणार आहे. महायुतीचा तोडगा निघतो की स्वतंत्र लढतींचे चित्र स्पष्ट होते, याकडे आता संपूर्ण शहराचे लक्ष लागून राहिले आहे.

## सेना-भाजप युतीमुळे पक्षांतरीतांसाठी मनसेची दारं बंद - मनसे नेते राजू पाटील

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**कल्याण :** कल्याण डोबिवली महानगरपालिका निवणुकीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांची युती झाली असून त्याबाबतचे जागावाटप देखील निश्चीत झाले आहे. आज संध्याकाळ पासून उमेदवारांना एबी फॉर्म वाटायला सुरवात करणार असल्याची माहिती मनसे नेते तथा माजी आमदार राजू पाटील यांनी दिली.

सर्व जागांवर आमचे उमेदवार फायनल झाले असून जागावाटप निश्चित झालं आहे. सेना भाजपाची युती शब्दशः झाली आहे मात्र मनातून तुटली आहे. दोन दिवसांत बघा काय काय होतं. आमच्यातले जे पैसे घेऊन दुसऱ्या पक्षात गेले आहेत त्यांचे आता फोन येत आहेत आम्हाला परत घ्या, परंतु त्यांच्यासाठी आमचे दरवाजे कायमचे बंद केले असल्याचे राजू पाटील यांनी सांगितले.

जैन मुनींनी त्यांचं काम करावं राजकिय पक्षांच्या सुपाऱ्या घेऊ नये. साधुसंत पवित्र काम करत असतात, त्यांनी राजकारणात पडू नये. शिवसेना भाजपा वाल्यांनी निवडणुकी अगोदरच चढाओढीने आयात केलेले काही लोकं आहेत. पैसे देऊन केले असतील किंवा काही लोकांना भीती दाखवून केले असेल त्यांचा उद्रेक होणार. तर केडीएमसीच्या 122 जागांपैकी 54 ते 55 जागा मनसेसाठी राखीव ठेवल्या आहेत इतर जागांमध्ये शिवसेना आणि महाविकास आघाडी आपले उमेदवार देणार आहेत.

केडीएमसी निवडणुकीच्या प्रचारासाठी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांची संयुक्त सभा कल्याण डोंबिवलीत होणार असून 122 पैकी जास्तीत जास्त नगरसेवक निवडून येऊन आमचा महापौर बसेल असा विश्वास राजू पाटील यांनी व्यक्त केला.

## युती नको; मैत्रीपूर्वक लढत हवी !

### कल्याण पश्चिमेत भाजप कार्यकर्त्यांचा आक्रोश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता




**कल्याण :** कल्याण–डोंबिवली महापालिका निवडणुकीच्या महायुतीत झालेल्या जागा वाटपाचा पार्श्वभूमीवर भाजपमधील असंतोष उफाळून येताना दिसत आहे. काल रात्री कल्याण पूर्वेत भाजपला 7 जागा देण्यात आल्याने पूर्वेतील भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आमदार सुलभा गायकवाड यांच्या कार्यालय बाहेर गोंधळ घालत घोषणाबाजी केली होती आता पूर्वेनंतर कल्याण पश्चिमेतही भाजपला फक्त 9 जागा दिल्याने भाजप कार्यकर्ते, पदाधिकारी आणि माजी नगरसेवक रस्त्यावर उतरले असून 'युती नको' अशा जोरदार घोषणा दिल्या जात आहेत. पालिका निवडणूक ही कार्यकर्त्यांची असून त्यांच्यावर अन्याय सहन केला जाणार नाही, असा ठाम इशारा यावेळी देण्यात आला आहे.

तर युती होऊ नये हि कार्यकर्त्यांची भावना आहे. लोकसभा निवडणुकीत केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांना पाडण्याचं काम शिवसेनेने केले. युतीत आमदार झाल्यावर भाजपा कार्यालयावर हल्ला करत, कार्यकर्त्यांना मारझोड केली. अनेक कार्यकर्त्यांवर खोटे गुन्हे दाखल केले आहेत. त्यामुळे शिवसेनेसोबत काम करण्यासाठी भाजपाचा एकही कार्यकर्ता तयार नसल्याचे माजी आमदार नरेंद्र पवार सांगितले. कल्याण पश्चिमेतील 38 जागांपैकी केवळ 9 जागा या भाजपाला देण्यात आल्या आहेत. मात्र आम्ही 38 जागा लढून या सर्व जागा जिंकणार एवढी ताकद भाजपाची तयार झाली आहे. त्यामुळे कल्याण पश्चिममध्ये आम्हाला मैत्रीपूर्ण लढत करण्याची परवानगी वरिष्ठ नेत्यांनी देण्याची मागणी यावेळी पवार यांनी केली.

युती झाल्याने गेली 10 वर्षे जे जे कार्यकर्ते प्रभागात भाजपाचे काम करत आले आहेत त्यांच्यावर अन्याय होणार असून इतर नगरपालिकांप्रमाणे मैत्रीपूर्ण लढत करावी अशी कार्यकर्त्यांची मागणी असल्याचे माजी नगरसेवक अर्जुन भोईर यांनी सांगितले.

तर भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून कार्यकर्ते महायुतीचे काम करत आले आहेत मात्र लोकसभा निवडणुकीत शिवसेनेने भाजपाचे काम केले नाही. कल्याण पश्चिमेत भाजपाला मानणारा वर्ग मोठा असल्याने पक्षाने आम्हाला मैत्रीपूर्ण लढण्याची परवानगी द्यावी अन्यथा स्वबळावर लढण्यासाठी भाजपा कार्यकर्ता सक्षम असल्याची प्रतिक्रिया भाजपाच्या महिला मोर्चा जिल्हा सरचिटणीस प्रीती दीक्षित यांनी दिली. कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचे वातावरण असून महायुती कार्यकर्त्यांना मान्य नसून तरीदेखील महायुतीसाठी जो रेशो ठेवला आहे तो अत्यंत कमी असून भाजपा कार्यकर्त्यांचा योग्य सन्मान करण्याची मागणी कल्याण शहर सरचिटणीस रवी गायकर यांनी केली.

आज भाजपाजे चांगले दिवस आले आहेत ते कार्यकर्त्यांमुळे आले आहेत हे पक्षातील नेते, मंत्री यांनी हे लक्षात ठेवावे. मात्र दुधातून माशी काढतात तसे कार्यकर्त्यांना बाजूला काढलं जात आहे. पक्षातील नेत्यांनी हे लक्षात ठेवावं त्यांचे आज जे अच्छे दिन आले आहेत ते भाजपा कार्यकर्त्यांमुळे आले असल्याची प्रतिक्रिया भाजप शहर सरचिटणीस साधना गायकर यांनी दिली.



## वाचक मनोगत

# सुपरस्टार राजेश खन्ना

हिंदी चित्रपट सृष्टीतील पहिले सुपरस्टार म्हणून ओळखले जाणारे जेष्ठ अभिनेते राजेश खन्ना यांची आज जयंती. राजेश खन्ना यांचा जन्म २९ डिसेंबर १९४२ रोजी पंजाबमधील अमृतसर येथे झाला. राजेश खन्ना यांचे मूळ नाव जतीन खन्ना असे होते. त्यांच्या आईचे नाव चंद्राणी खन्ना तर वडिलांचे नाव लाला हिराणी असे होते. त्यांचे वडील शाळेत मुख्याध्यापक होते. त्यांच्या एका जवळच्या नातेवाईकांना मुलबाळ नव्हते म्हणून त्यांच्या आई वडिलांनी त्यांना त्या नातेवाईकांकडे दत्तक दिले. त्यांच्या नवीन आईचे नाव लीलावती खन्ना तर वडिलांचे नाव चुनीलाल खन्ना असे होते. चुनीलाल खन्ना रेल्वे कंत्राटदार होते. ते मुंबईत राहत होते. राजेश खन्ना हे सेंट सबिस्टाईन गॉन हायस्कूल येथे शिकत असताना त्यांची रवी कपूर यांच्याशी ओळख झाली. रवी कपूर म्हणजेच हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध अभिनेते जितेंद्र. राजेश खन्ना व जितेंद्र यांनी कॉलेज जीवनात अनेक नाटकात एकत्र काम केले. नंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी राजेश खन्ना हे पुण्यात आले. पुण्यात दोन वर्ष शिक्षण घेतल्यावर ते पुन्हा मुंबईला परतले. मुंबईत काही दिग्दर्शकांनी टॅलेंट हंट स्पर्धा आयोजित केली. राजेश खन्ना यांच्या काकांनी त्यांचे नाव या स्पर्धेकरिता नोंदवले. ते नोंदवताना त्यांनी त्यांचे नाव जतीन खन्ना ऐवजी राजेश खन्ना म्हणून नोंदवले पुढे याच नावाने ते ओळखले जाऊ लागले. या स्पर्धेत त्यांनी पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक मिळवले. त्यांच्या अभिनयाने त्याकाळातील दिग्गज दिग्दर्शक प्रभावित झाले. १९६६ साली चेतन आनंद यांनी त्यांना आखरी खत या चित्रपटात संधी दिली हाच त्यांचा पहिला चित्रपट. हा चित्रपट ऑस्करला गेला होता. पहिल्याच चित्रपटातील त्यांच्या अभिनयाने चित्रपट रसिक तसेच जाणकार प्रभावित झाले त्यामुळे त्यांना अनेक चित्रपट मिळाले. त्याकाळातील यशस्वी दिग्दर्शक असणारे शक्ती सामंत यांनी त्यांना आराधना या चित्रपटात नायकाची भूमिका दिली. या चित्रपटात शर्मिला टागोर या त्यांच्या नायिका होत्या. चित्रपट सुपरहिट झाला. या चित्रपटातील सर्व गाणी लोकप्रिय झाली. या चित्रपटा नंतरच राजेश खन्ना सुपरस्टार म्हणून ओळखले जाऊ लागले. राजेश खन्ना यांची अदाकारी, संवाद फेकीची लकब यावर तरुणाई फिदा झाली. विशेषतः कॉलेज मधील मुली त्यांच्यावर जीव ओवाळून टाकू लागल्या. त्यांचे चाहते त्यांच्या गाडीचे चुंबन घ्यायचे. मुली त्यांच्या गाडीची धूळ आपल्या भांगेत भरत. बऱ्याचश्या मुलींनी त्यांच्या फोटोशी लग्न केले होते. त्यांना चाहत्यांचे जितके प्रेम लाभले तितके प्रेम कोणत्याच कलाकाराला लाभले नाही. राजेश खन्ना यांचे सलग १५ चित्रपट सुपरहिट झाले हा एक विक्रम आहे. तो अजूनही कोणत्या अभिनेत्याला तोडता आला नाही. शर्मिला टागोर, मुमताज, अशा पारेख, तनुजा यांच्याशी त्यांची चांगली केमिस्ट्री जमली. सत्तरच्या दशकात राजेश खन्ना सुपरस्टार पदावर आरूढ झाले होते. चालण्या बोलण्याची विशिष्ट ढब, मानेला खास झटका देत, हातवारे करत नाचण्याची अनोखी शैली, जबरदस्त संवाद फेक आणि ओठावर रुंजी घालतील अशी गाणी यामुळे राजेश खन्ना हे अफलातून रसायन बनून गेले. त्याकाळात सर्वाधिक मानधन घेणारे राजेश खन्ना यांची प्रेम प्रकरणेही गाजली पण १९७३ साली त्यांनी आपल्या पेक्षा कितीतरी लहान वयाच्या डिंपल कपाडिया यांच्याशी विवाह केला. १९९२ साली काँग्रेसच्या वतीने त्यांनी दिल्ली मतदार संघातून लोकसभेची पोटनिवडणुक लढवली आणि ते खासदार म्हणून निवडून आले. १८ जुलै २०१२ रोजी राजेश खन्ना यांनी चाहत्यांना अलविदा म्हणत जगाचा निरोप घेतला आणि बॉलिवूडचा पहिला सुपरस्टार काळाच्या पडद्याआड गेला. "बाबूमोशाय....... बाबू मोशाय जिंदगी और मौत उपरवाले के हात है जहाँपणा... जिसे ना तो आप बदल सकते है ना मै.... हम सब तो रंगमंच की कटपुतलीया है, जीसकी डोर उपरवालेकी उंगलीओमे बंधी है.... कब कोण कैसे उठेगा कोई बता नहीं सकता....." आनंद कभी मरते नहीं वह हमेशा याद रहते है....

we all miss you.....

राजेश खन्ना यांना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
**९९२२५४६२९५**

# पालिका अधिकारी निवडणूकीत गुंतल्याने भिवंडीत अनधिकृत बांधकामाचा सुळसुळाट?

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी (प्रतिनिधी ) :** भिवंडी महानगरपालिकेच्या आगामी होणाऱ्या सार्वत्रिक निवडणूक निमित्ताने महापालिकेचे आयुक्त,काही अधिकारी वर्ग आणि कर्मचारी निवडणूक कामात गुंतल्याचा गैरफायदा घेत भिवंडी महापालिका क्षेत्रात काही विकासकांनी पालिकेच्या काही प्रभाग अधिकारी,बीट निरीक्षक व कर्मचाऱ्यांशी ठेकेदार दलाला मार्फत गुपचूप संधान बांधून अर्थ कारण करीत मोठ्या संख्येने अनाधिकृत बांधकाम सुरु केले असून सुट्टीच्या दिवसात तर या अनधिकृत बांधकामाच्या ठिकाणी राजरोसपणे स्लॅबचे काम सुरु आहे.अशा अनधिकृत बांधकामाकडे पालिकेचे बिट निरीक्षक आणि अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत असून शहरात अनधिकृत बांधकामात वाढ होत आहे.याबाबत आयुक्त अनमोल सागर यांनी लक्ष देऊन अनाधिकृत बांधकाम संदर्भात अहवाल मागवून चौकशी करावी अशी मागणी पीपल्स रिपब्लिकन पक्ष व भीमशक्ती संघटना पदाधिकाऱ्यां कडून होत आहे.

भिवंडी महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या निमित्ताने शहरात विविध राजकीय पक्ष व सामाजिक कार्यकर्ते आपापल्या उमेदवाराच्या प्रचाराला लागलेले आहेत.त्यामुळे सर्व ठिकाणी अलबेल कारभार सुरू आहे.अनधिकृत बांधकामाविषयी पीपल्स रिपब्लिकन पक्षाचेवतीने महापालिका प्रशासनाकडे लेखी तक्रारी करण्यात आले आहे मात्र पालिका प्रशासनाला कोणतेही सोयरसुतक नाही. कारण अशा अनधिकृत इमारतीमध्ये राहणारे रहिवासी मतदार असल्याने त्यांना राजकीय दबावामुळे दुखावत नाही. त्यामुळे शहरातील विविध भागात अनधिकृत बांधकाम मोठ्या संख्येने झालेले आहेत.या बांधकाम विरोधात वारंवार तक्रार देऊनही प्रशासक आणि अधिकारी मुक भूमिका बजावत असल्याने अनेकांनी भिवंडी व मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या आहेत.

> **भिवंडी महानगरपालिकेच्या निवडणूक कामासाठी काही अधिकारी आणि कर्मचारी गुंतलेले आहेत. त्यामुळे पालिकेच्या नियमित कामांना व्यत्यय होत आहे. मात्र अत्यावश्यक कामांसाठी आमचे अधिकारी कर्मचारी उपलब्ध आहेत. शहरात नव्याने अनधिकृत बांधकाम होत असेल तर माहिती घेऊन निवडणूक काळात होणाऱ्या अनधिकृत बांधकामांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल. ■ विक्रम दराडे उपायुक्त, भिवंडी मनपा**

महानगरपालिकेने इमारत बांधकाम परवानगी दिल्यानंतर बांधकामाच्या ठिकाणी विकासकाचे बांधकाम संबंधी अधिकृतपणे फलक लावणे आवश्यक आहे मात्र महापालिका प्रभाग अधिकारी, सहाय्यक अधिकारी व बीट निरीक्षक दुर्लक्ष करीत असल्याने त्या ठिकाणी परवानगी पेक्षा अधिक बांधकाम करून अनाधिकृत इमारत उभी केली जात आहे.शहरात काही ठिकाणी अनधिकृत बांधकामावर तोडू कारवाई करण्यासाठी पोलिसांनी बंदोबस्त दिला असताना अचानकपणे कारवाई थांबविल्याच्या घटना घडलेल्या आहेत. त्यामुळे पोलिसांवर ताण येत असल्याचे पोलीस अधिकारी खाजगीत सांगत आहेत. शहरात अनाधिकृत बांधकाम होऊ नये यासाठी महापालिका आयुक्त प्रशासनाने काळजी घ्यावी अशा न्यायालयाचे सुचना आहेत मात्र त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे.

शहरात अनधिकृत बांधकामे झाल्याने शहराचा नियोजनात्मक विकास झाला नसल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे शहराचा विकास होण्या ऐवजी शहराचा भकासपण वाढला आहे. पालिका प्रशासनाच्या अशा बेजबाबदार कामांमुळे पालिकेकडे विकास निधी भरून शहरात नव्याने होणाऱ्या अधिकृत इमारतींवर गंभीर परिणाम होऊन अधिकृत व्यवसायावर परिणाम होत आहे.अनधिकृत बांधकामामुळे कष्टकरी लोक इमारती मध्ये घर घेतात मात्र अनाधिकृत इमारत ठरल्यानंतर त्यांचे मोठे नुकसान होतआहे.अनाधिकृत बांधकामामुळे शहराच्या नियोजनात्मक विकासाला बाधा येत आहे.सध्या महापालिका निवडणुकीचे वारे वाहू लागल्याने कर्मचारी व अधिकारी निवडणूक कामात व्यस्त झाला आहे. ही बाब लक्षात घेऊन काही विकासक पालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना दलाला मार्फत हाताशी धरून मोठ्या प्रमाणात अनाधिकृत बांधकाम उभी करत आहेत.याकडे आयुक्तांनी लक्ष द्यावे अशी मागणी पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे प्रमुख सिद्धीक फक्की यांनी केली आहे.

# साप्ताहिक वारानुसार कचरा वर्गिकरणाला शिवसेना ठाकरे पक्षाचा आक्षेप

**प्रत्येक सोसायटीत छोटे डंम्पिंग ग्राऊंड तयार होण्याची भिती - उपनेते विजय साळवी**

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण डोबिवली महापालिकेने शुन्य कचरा मोहिम राबवितांना आता साप्ताहिक वारानुसार कचऱ्याचे वर्गीकरण करण्याचे आदेश दिले आहेत. या आदेशामुळे अनेक सोसायट्यांमध्ये डंम्पिंग ग्राउंड तयार होतील असे सांगत शिवसेनेचे उपनेते विजय साळवी यांनी हे आदेश त्वरीत बदलण्याची मागणी केली आहे.

महापालिकेने काढलेल्या नव्या आदेशानुसार यापुढे शुन्य कचरा मोहिमेत सोमवारी प्लॅस्टिक बाटल्या व इतर, मंगळवारी कापड. बुधवारी कागद व पुठ्ठा, गुरुवारी प्लॅस्टिक भंगार. शुक्रवारी ई-वेस्ट-थर्माकॉल रबर. शनिवारी काचेच्या वस्तू, रविवारी कागदी पुठ्ठा अशा प्रकारे कचरा संकलित केला जाणार आहे. या आदेशामुळे गृहनिर्माण संस्था, चाळीं वगैरे भागातील नागरीकांना कचऱ्यांचे वर्गीकरण करावे लागणार आहे. असे केल्यास प्रत्येक ठिकाणी छोटे डंम्पिंग ग्राऊंड तयार होण्याची भिती उपनेते विजय साळवी यांनी व्यक्त केली आहे.

विशेष म्हणजे महापालिकेने कचरा संकलनासाठी सुमित एन्क्लोप्लास या ठेकेदाराला कचरा



उचलण्यासाठीचा दहा वर्षाचा ठेका दिला आहे. त्यासाठी ठेकेदाराला ८५ कोटी रुपये दरवर्षी दिले जाणार आहे. दहा वर्षांचे ८.५ अब्ज एवढी रक्कम होणार आहे. ठेकेदाराचे काम कमी करण्याचा यामागे उद्देश तर नाही ना? असा सवाल विचारला जात आहे.

यापूर्वी ओला व सुका कचरा वेगळा देण्याबाबतचे आदेश होते त्याप्रमाणे दिला जात होता. आता सुका कचरा आठवडाभर साठवून आठवड्याचे वारानुसार द्यावा लागणार आहे. याचाच अर्थ ठेकेदाराचे अर्धे काम गृहनिर्माण संस्थांना करावे लागणार आहे. या आदेशाप्रमाणे पुढील काळात सोसायट्यांनी आपला कचरा सोसायटीतच जाळून विल्हेवाट लावावी असेही आदेश ठेकेदाराला सहकार्य करण्यासाठी निघू शकतात अशी शंका व्यक्त करण्यात आली आहे. एकी कडे कचरा उचलण्यासाठी महापालिकेला विशेष 'कर' ही द्यायचा आणि ठेकेदाराला त्रास नको म्हणून आठवडाभर कचरा साचवून ठेवायचा हे महापालिकेचे धोरण खपऊन घेतले जाणार नाही. हा आदेश महापालिकेने त्वरीत रद्द न केल्यास शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे मोठे आंदोलन करण्याचा इशारा उपनेते विजय साळवी यांनी दिला आहे.

## बदलापूर जवळच्या आंबेशिव, काराव पाठोपाठ

# वांगणी गावातही बिबट्याची दहशत

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**बदलापूर :** बदलापूर जवळच्या आंबेशिव, काराव पाठोपाठ आता वांगणी गावातही बिबट्याची दहशत पसरली आहे. इथल्या शिवाजीनगर जुना भेंडी पाडा परिसरात बिबट्यानं दोन श्वानांची शिकार केल्याच समोर आले आहे. भर लोकवस्तीत बिबट्यानं श्वानांवर हल्ला केल्यामुळे इथले नागरिक धास्तावले आहेत. बिबट्यानं श्वानांवर हल्ला केल्याची बातमी समजतात वन विभागाचं पथक वांगणी गावात दाखल झालं असून नागरिकांना सतर्क राहण्याचा आवाहन वनविभागाकडून करण्यात आलं आहे.

गेल्या काही दिवसांपासून आंबेशीव आणि काराव या दोन गावात बिबट्याचं दर्शन घडल्याचं समोर आल्या होतं. त्यानंतर आता बिबट्याने थेट वांगणीत प्रवेश केल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीची लाट पसरली आहे. गेल्या काही दिवसांत वांगणी आणि परिसरात एक मादी बिबट्या आणि दोन बछडे दिसल्याचं स्थानिकांचं म्हणणं आहे. या बिबट्यांचा लवकरात लवकर बंदोबस्त करावा अशी मागणी स्थानिकांकडून केली जाती आहे.

## कणे प्राथमिक शाळेत

# माजी विद्यार्थ्यांच्या आठवणींचा सुवर्ण सोहळा








**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण(प्रतिनिधी)**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत माझी शाळा माझा अभिमान उपक्रम अंतर्गत पेण तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कणे येथे शाळेच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा कार्यक्रमाचे अध्यक्ष चंद्रकांत फुलाजी म्हात्रे-माजी मुख्याध्यापक यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला.

तसेच या शाळेतील विद्यमान शिक्षकांनी माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्या मध्ये विद्यार्थ्यांच्या नृत्य आणि पथनाट्यास प्रचंड प्रतिसाद मिळाला. कणे शाळेचे विद्यार्थी आज यशस्वी झाल्याचे पाहताना उपस्थित असणाऱ्या प्रत्येक माजी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला तो अभिमान आणि आनंद, हेच त्यांच्या आयुष्याच्या कष्टाचे खरे फळ होते. वर्गात पुन्हा एकदा फेरफटका मारताना भले त्या शाळेची इमारत बदललेली असेल पण माजी विद्यार्थ्यांच्या मनात जुने दिवस जुन्या आठवणी नक्कीच पुन्हा एकदा जिवंत झाल्या,हसणे, गप्पा, खोड्या आणि आठवणींचा ओघ पुन्हा वाहू लागला. अनेक वर्षांनी शाळेला दिलेल्या सदिच्छा भेटीमुळे क्षणात काही काळ मागे फिरल्यासारखे वाटले. त्यातूनच बऱ्याच माजी विद्यार्थ्यांनी शाळेसाठी आणि शाळेतील विद्यार्थ्यांसाठी सढळ हस्ते आर्थिक मदत केली.हा मेळावा केवळ कार्यक्रम नव्हता,तो होता जुन्या आठवणींना उजाळा देणारा, नात्यांना नव्याने बांधणारा एक सुंदर अनुभव! यावेळी माजी विद्यार्थी संघाची स्थापना करण्यात आली. या कार्यक्रमाला उपस्थित मान्यवरांमध्ये सरपंच सुगिता नंदकुमार पाटील उपसरपंच देविदास पाटील शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष बाळाराम पाटील उपाध्यक्षा सौ.हेमलता पाटील गाव कमिटी अध्यक्ष राजेंद्र म्हात्रे,माजी सैनिक जनार्दन जयराम म्हात्रे केंद्रप्रमुख राजाराम म्हात्रे, विविध कार्यकारी सहकारी संस्था चेअरमन संभाजी पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष भास्कर पाटील, धिरज पाटील, जयवंत बांधणकर, शामकांत पाटील, सामाजिक कार्यकर्त्या नंदाताई म्हात्रे ,माजी पोलीस उपनिरीक्षक रामदास पाटील-माजी सरपंच कुणाल पाटील, सौ.निकिता म्हात्रे, सौ.विद्या पाटील, श्री. विजय पाटील, सौ.निता भोईर, अजित पाटील, नितेश पाटील, शरद पाटील, सौ.नंदिनी पाटील, ज्योती पाटील,आदी मान्यवरांच्या उपस्थितीत आनंद सोहळा साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सुत्रसंचलन आदिनाथ पाटील गुरुजी यांनी केले. माजी विद्यार्थ्यांचा आनंद सोहळा यशस्वीरित्या संपन्न करण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.आश्लेषा अशोक पाटील सहशिक्षिका सौ.चेतना विनायक मोकल. सौ. रेणुका मिलिंद दस्तुरे व सर्व सहकारी शिक्षक यांनी अतिशय मेहनत घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.

# शाई-वेलूक येथे भव्य आरोग्य शिबीर व समुपदेशन कार्यक्रम संपन्न

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** मुरबाड तालुक्यातील शाई व वेलूक येथे डॉ. बी. एम. एन. गृहविज्ञान महाविद्यालय, मुंबई आणि डॉ. कविता वरे-भालके यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य आरोग्य शिबीर व समुपदेशन कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला. या कार्यक्रमाचे मार्गदर्शन डॉ. रुपाली सेनगुप्ता यांनी केले. या आरोग्य शिबिरामध्ये नागरिकांसाठी विविध आरोग्य तपासण्या व मार्गदर्शन उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये उंची, वजन, बीएमआय, Hand Grip, रक्तदाब, साखर तसेच हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली. यासोबतच पोषण व आहार विषयक मार्गदर्शन, सर्वसाधारण आरोग्य समुपदेशन तसेच महिलांच्या आरोग्य विषयक विशेष मार्गदर्शन देण्यात आले.

या शिबिराचा लाभ परिसरातील महिलांसह अनेक ग्रामस्थांनी घेतला. आरोग्याबाबत जनजागृती करणे, योग्य आहाराचे महत्त्व पटवून देणे व आजारांचे वेळेत निदान होणे, हा या शिबिराचा मुख्य उद्देश होता. ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत आरोग्य सुविधा पोहोचविण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असून, डॉ. कविता वरे-भालके यांच्या सामाजिक उपक्रमातून आरोग्य, पोषण व महिलांच्या सक्षमीकरणासाठी सातत्याने कार्य केले जात असल्याचे यावेळी उपस्थितांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व सहकारी, आरोग्य तज्ञ व स्वयंसेवकांचे विशेष सहकार्य लाभले. उपस्थित ग्रामस्थांनी अशा आरोग्य शिबिरांचे नियमित आयोजन व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

# कनकेश्वर फाटा येथे लायन्स फेस्टिव्हलचे आयोजन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**अलिबाग, प्रतिनिधी-** अलिबाग-मांडवा रोडवरील कनकेश्वर फाटा येथे लायन्स क्लब ऑफ अलिबाग-मांडवा यांच्या वतीने भव्य 'लायन्स फेस्टिव्हल'चे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव ८ जानेवारी ते १२ जानेवारी २०२६ या कालावधीत दररोज सायंकाळी ४ ते रात्री १० वाजेपर्यंत रंगणार असून, स्थानिकांसह पर्यटकांसाठी हे आकर्षणाचे केंद्र ठरणार आहे. या महोत्सवाचे नेटके नियोजन फेस्टिवल चेअरमन नितीन अधिकारी आणि समन्वयक एमजेएफ अमिष शिरगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली फेस्टिवल कमिटीद्वारे करण्यात येत आहे. या कमिटीमध्ये समन्वयक म्हणून प्रथम उप जिल्हा प्रांतपाल पीएमजेएफ प्रवीण सरनाईक, मुख्य समन्वयक माजी जिल्हा प्रांतपाल पीएमजेएफ अनिल जाधव, उपाध्यक्ष अभिजीत गुरव, सचिव धवल राऊत, खजिनदार सुधीर पुरो, क्लबचे अध्यक्ष ऋग्वेद ठाकूर, प्रथम उपाध्यक्ष हर्षद पाटील, रिजन चेअरपर्सन गिरीश म्हात्रे, झोन चेअरपर्सन डॉ. रेखा म्हात्रे आणि एलसीआयएफ समन्वयक एमजेएफ अरविंद घरत या अनुभवी टीमचा समावेश असून त्यांच्या देखरेखीखाली महोत्सवाची तयारी सुरू आहे.

पाच दिवस चालणाऱ्या या महोत्सवात लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांसाठी मनोरंजनाची पर्वणी असणार आहे, ज्यामध्ये विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल्स, गृहोपयोगी वस्तू, सौंदर्य प्रसाधने आणि मुलांसाठी खास अम्युझमेंट पार्कचा समावेश आहे. विशेष म्हणजे, आर. डी. सागवेकर ज्वेलर्स यांच्या सौजन्याने महोत्सवात दररोज 'लकी ड्रॉ'चे आयोजनही करण्यात आले आहे. महोत्सवाचा शुभारंभ ८ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजता उद्घाटन सोहळ्याने होईल, त्यानंतर रात्री ७:३० वाजता शालेय नृत्य स्पर्धा पार पडतील. ९ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजता 'मराठमोळी झेड-फ्युजन' आणि रात्री ७:३० वाजता 'दर्याभवानी' हे ऐतिहासिक नाट्य सादर केले जाणार आहे.

शनिवार, १० जानेवारी रोजी रात्री ७:३० वाजता 'शिवकालीन परंपरा' हा आधुनिक फॅशनच्या जगातील मराठी संस्कृती जपणारा सोहळा रंगणार असून, याचे कोरिओग्राफर अशमीक कामठे आहेत. ११ जानेवारी रोजी रात्री ७:३० वाजता 'लायन्स मांडवा श्री २०२६' ही भव्य शरीरसौष्ठव स्पर्धा रंगणार आहे. महोत्सवाचा समारोप १२ जानेवारी रोजी रात्री ७:३० वाजता 'हेअर अँड ब्युटी ईल्युजन २०२६' या सौंदर्य स्पर्धेने होईल. या संपूर्ण उपक्रमाला ग्रुप ग्रामपंचायत बोरीस-गुंजीस आणि अनुप मेहता अँड ग्रुप यांचे विशेष सहकार्य लाभले असून, जास्तीत जास्त नागरिकांनी या महोत्सवाचा आनंद घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# भविष्यवेध



**सोमवार**
**29 डिसेंबर 2025**

**मेष**
सकारात्मक संवाद होतील. प्रत्येक काम नियोजित रीतीने आणि एकाग्रतेने केल्यास यश मिळेल. गुंतवणुकीशी संबंधित महत्त्वाच्या योजनाही यशस्वी होतील.

**वृषभ**
मद्यपानाच्या सवयीवर ताबा मिळविण्यासाठी शुभ दिवस. धन हानी होण्याची शक्यता आहे. देवाण-घेवाणीत सतर्क राहाणे तुमच्यासाठी चांगले.

**मिथुन**
दिवस अत्यंत महान आहे, कामाकडे लक्ष जाईल, जे लोक पैश्याला विनाकारण खर्च करत होते आज त्यांनी आपल्यावर काबू ठेवला पाहिजे धनाची बचत करा.

**कर्क**
एकमेकांचा दृष्टिकोन समजावून घेऊन वैयक्तिक प्रश्न सोडवा. दिवस चांगला जाणार आहे. जवळच्या नातेवाईकांच्या आगमनामुळे उत्सवाचे वातावरण असेल

**सिंह**
तब्येत एकदम ठीक राहील. दिवस खूप चांगला जाणार आहे. आज तुम्ही तुमच्या आई-वडिलांच्या आरोग्याबाबत चिंतेत असाल. खर्चात उदार होऊ नका

**कन्या**
इतरांच्या कामात हस्तक्षेप करू नका, यामुळे जीवनात शांतता येईल. दिवस आत्मविश्वास आणि अपेक्षांचा आहे. कोणत्याही स्थितीत निराश होऊ नका.

**तुळ**
मनोरंजक , माहितीपूर्ण साहित्य वाचण्यासाठी वेळ घालवाल, कोणतेही महत्त्वाचे काम वेळेवर पूर्ण होईल. वरिष्ठांची मर्जी सांभाळाल. समधान मिळेल.

**वृश्चिक**
विद्यार्थी अभ्यासावर लक्ष केंद्रित करतील, आज एक नवीन भेट आणली आहे. आज तुमच्या मनात अनेक सकारात्मक भावना येतील. देवपूजेत दिवस व्यतित होईल.

**धनु**
प्रियकरासाठी दिवस अनुकूल आहे. कोणाशीही वादात पडू नका अहंकारावर नियंत्रण ठेवा. जास्त विचार केलात तर काही महत्त्वाची उपलब्धी हातून जाईल.

**मकर**
दिवस खूप चांगला जाणार आहे. आज तुमचे विशेष काम तुमच्या इच्छेनुसार होणार आहे, त्यामुळे कोणतीही मेहनत कमी करू नका. फळाची अपेक्षा नको.

**कुंभ**
योग्य निर्णय घेणे खूप महत्वाचे आहे. आजच्या दिवसाची सुरुवात चांगली होईल. आज तुम्ही उर्जेने परिपूर्ण असाल जेणेकरुन हवे ते सर्व साध्य करता येईल.

**मिन**
संवादाशी संबंधित काही नवीन तंत्रज्ञानाचा तुम्हाला नक्कीच फायदा होईल. तुमच्या आजूबाजूच्या लोकांमध्ये तुमची चांगली प्रतिमा तयार होईल. चिंता नाहीशी होईल.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कॉलेज,खर्डी
मुंबई विद्यापीठाशी संलग्न "नॅक मूल्यांकन प्राप्त B Grade"
ADMISSION OPEN 2025-26
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE (IT)
UNDER GRADUATE: B.Sc. I.T. | B.Sc. CHEMISTRY MATHS | B.A.F. | BAMMC | B.Com. | B.A.
POST GRADUATE: M.Sc. IT | M.Sc. CHEMISTRY | M.Com. ADVANCED ACCOUNTANCY | M.A. MARATHI | M.A. ECONOMICS | M.A. SOCIOLOGY | M.A. GEOGRAPHY
Look forward to a BRIGHTER FUTURE
8669244522
9923992390

# भिवंडीतील निवडणूक कार्यालयात स्ट्रॉंगरुम तयार करण्याची धावपळ
## मतपेट्यांच्या सुरक्षितेवर सीसीटीव्ही कॅमेरेची नजर...

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**भिवंडी (शरद भसाळे )**

येत्या १५ जानेवारी रोजी होणाऱ्या भिवंडी निजामपूर शहर महानगर पालिकेच्या निवडणुकीसाठी पोलीस व महापालिका प्रशासन विभाग सुसज्ज झाले असुन निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात उमेदवारी अर्ज स्विकारण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.भिवंडी शहरातील विविध ठिकाणी मिळून सात क्षेत्रीय निवडणूक कार्यालये सुरु झाली असून राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निवडणूक अधिकारी तथा मनपा आयुक्त अनमोल सागर यांनी या सर्व कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची आणि त्यांना सहकार्य करणाऱ्या पदाधिकारी आणि अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे.राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार या प्रत्येक क्षेत्रीय निवडणूक कार्यालयात सुरक्षित असा स्वतंत्र स्ट्रॉंग रूम बनविण्याचे धावपळ काम जोमात सुरु झाले असून त्याच ठिकाणी मतमोजणी होणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.



भिवंडी शहर महानगर पालिका निवडणूकी करीता भिवंडी शहरातील मिल्लतनगर येथील फरहान खान सभागृह (आर.ओ-१),भादवड येथील संपदा नाईक सभागृह (आर.ओ-२),भादवड संपदा नाईक सभागृह (आर.ओ-३), कामतघर येथील वऱ्हाळादेवी माता सभागृह (आर.ओ-४), अल्लाज शाह मोहम्मद सभागृह (आर.ओ-५),कोंबडपाडा येथील राजय्या गाजेंगी सभागृह (आर.ओ-६), राजय्या गाजेंगी सभागृह (आर.ओ-७), असे एकूण सात ठिकाणी क्षेत्रीय निवडणूक कार्यालये आहेत. निवडणुकीतील एकूण २३ प्रभागापैकी आर.ओ- ३ व ४ यांच्या कार्यालयात प्रत्येकी ४ प्रभाग असून इतर पाच क्षेत्रीय निवडणूक कार्यालयात प्रत्येकी ३ प्रभागाचा समावेश आहे. या सर्व क्षेत्रीय निवडणूक कार्यालया अंतर्गत असलेल्या एकूण ईव्हीएम मशीनच्या पेट्यांना लागणाऱ्या स्ट्रॉग रूम साठी स्वतंत्र सुरक्षित जागा तयार करण्याचे काम सुरु झाले असून या स्ट्रॉग

रूमला तीन बाजूना पूर्णपणे बंद करण्यात येणार आहे. एका बाजूने रूममध्ये जाण्यासाठी मार्ग ठेवला असून तो मतदानाच्या पेट्या आत ठेवल्यानंतर सर्वांसमक्ष सीलबंद करून स्ट्रॉंग रूमच्या अवतीभोवती कडक पहारा व सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात येणार आहेत.अशी माहिती सर्व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिली.त्यापैकी मिल्लतनगर येथील फरहान सभागृहाच्या पहिल्या मजल्यावर मतदान झालेल्या ईव्हीएम मशीनच्या पेट्यांना लागणाऱ्या जागेसाठी सिमेंटच्या भिंतीचे रूम बनविण्याचे काम सुरु झाले असून इतर ठिकाणी देखील रूमच्या तीन बाजू बंद करण्यासाठी कडक उपाययोजना करण्याचे काम सुरु केले आहे.निवडणूक अधिकारी अनमोल सागर, निवडणूक निर्णय अधिकारी अमित सानप, शशिकांत गायकवाड,हर्षलता गेडाम, महेश हरिश्चंद्र तहसीलदार अभिजित खोले याच्यासह विविध अधिकाऱ्यांनी स्ट्रॉंग रूम व परिसराची पाहणी केली करून संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना मौलिक सुचना दिल्या आहेत.

१५ जानेवारी २०२६ रोजी मतदान झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी शुक्रवारी सकाळी १० वाजल्यापासून त्याच क्षेत्रीय कार्यालयाच्या ठिकाणी मतमोजणी होणार आहे. हि मतमोजणी झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी विजयी उमेदवारांची घोषणा करणार आहे.सध्या शहरातील सर्व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची सात क्षेत्रीय कार्यालये निवडणूक घेण्यासाठी सज्ज झाली आहेत. तर प्रत्येक निवडणूक कार्यालया बाहेर पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

# कल्याण डोंबिवली पालिका निवडणुकीसाठी कर्मचाऱ्यांना दोन ठिकाणच्या नियुक्त्या ?

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** – कल्याण डोंबिवली पालिका निवडणुकीसाठी एकूण सुमारे आठ हजार कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. या कामासाठी कल्याण डोंबिवली शहरे आणि परिसरातील शासकीय आस्थापना, शाळा, महाविद्यालयांमधील शिक्षक, कर्मचाऱ्यांना निवडणूक कामासाठी नियुक्त करण्यात आले आहे. या कर्मचाऱ्यांना निवडणूक कामासाठी एक कर्तव्याचे पत्र देण्याऐवजी निवडणूक नियंत्रणाचे काम करणाऱ्या विभागाकडून एका कर्मचाऱ्याला निवडणुकीचे दोन ठिकाणचे काम करण्याचे पत्र पाठवून गोंधळ उडविला आहे.

कल्याण डोंबिवली पालिका क्षेत्रातील अनेक शासकीय कर्मचारी, खासगी, अनुदानित शाळांमधील शिक्षक, शिक्षकांना अशाप्रकारे दोन ठिकाणी काम करण्याची नियुक्ती पत्रे देण्यात आली आहेत. त्यामुळे आपण कल्याण डोंबिवली पालिका हद्दीतील नऊ निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांपैकी कोणत्या विभागात काम करायचे असे प्रश्न कर्मचारी, शिक्षकांना पडले आहेत. पालिकास्तरावरील या गोंधळामुळे निवडणूक कामावर कोणाचे नियंत्रण आहे की नाही असे प्रश्न नियुक्त कर्मचाऱ्यांकडून करण्यात येत आहेत. निवडणूक कामासाठी कर्मचाऱ्यांची प्रशिक्षणे सुरू झाली आहेत. त्यामुळे आपण कोणत्या निवडणूक कार्यालयात आपले कर्तव्य बजावण्यासाठी जायचे असे प्रश्न निवडणूक कर्मचाऱ्यांना पडले आहेत. निवडणूक कामातील बहुतांशी कर्मचारी हे शहापूर, मुरबाड, ठाणे, नवी मुंबई, भिवंडी परिसरातून येणारे आहेत. त्यामुळे या कर्मचाऱ्यांना आपणास आलेल्या दुहेरी पत्राविषयी कोणाला विचारणा करायची असे प्रश्न पडले आहेत. यापूर्वी पालिका निवडणुकींच्यावेळी

### कोणत्या निवडणूक कार्यालयात कर्तव्य बजावण्यासाठी जायचे ?
#### कर्मचाऱ्यांना संभ्रम

असा गोंधळ नव्हता. आत्ताच हे गोंधळ का निर्माण झाले असे प्रश्न कर्मचारी करत आहेत. यापूर्वीचे पालिकेतील निवडणुकीचे काम करणारे प्रस्थापित अधिकारी सेवानिवृत्त झाले. काहींनी या कामातून काढून घेतले आहे. त्यामुळे शासन सेवेतून आलेल्या पालिका भौगोलिक क्षेत्राची माहिती नसलेले अधिकारी निवडणुकीचे काम करत असल्याने हा गोंधळ उडाल्याची पालिकेत चर्चा आहे.

कल्याण डोंबिवली पालिका निवडणूक कामात बहुतांशी वर्ग हा महिला शिक्षकांचा आहे. शालेय अभ्यासक्रमाकडे लक्ष देऊन या शिक्षकांना निवडणूक कामे करावी लागत आहेत. कर्तव्यात हलगर्जीपणा केला तर गुन्हा दाखल करण्याचे इशारे निवडणूक अधिकारी देतात. यापूर्वीच्या लोकसभा, विधानसभा निवडणूक काळात अशाप्रकारचे गुन्हे निवडणूक कामांपासून पळ काढणाऱ्या कर्मचाऱ्यांवर दाखल झाले आहेत.

अनेक निवडणूक कर्मचाऱ्यांनी प्रभागस्तरावरील निवडणूक कार्यालयात हजेरी लावली. त्याठिकाणी स्थानिक निवडणूक अधिकाऱ्यांनी तुम्ही आमच्या कार्यालयात निवडणूक कामासाठी हजर झाल्याची नोंद करा आणि तसे मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना कळवून टाका. आपण एके ठिकाणी कर्तव्यावर हजर झाला आहात ते आम्ही वरिष्ठांना कळवू असे सूचवून प्रभागस्तरावर गोंधळलेल्या कर्मचाऱ्यांचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. पालिका सामान्य प्रशासन विभागाकडून अशाप्रकारच्या दोन कर्तव्यावरील पत्रे कर्मचाऱ्यांना चुकून काढण्यात आली आहेत. त्याची दुरुस्ती सुरू आहे. कर्मचाऱ्यांनी त्याने दिलेल्या कोणत्याही एका कार्यालयात हजर राहून निवडणुकीचे काम सुरू करावे, असे एका पालिका अधिकाऱ्याने सांगितले.

# मोठ्या अपघातास कारणीभूत ठरणार एनएमएमटी बस चालकांचा बेजबाबदारपणा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**घणसोली नवी मुंबई :** घणसोली बस आगार येथून सकाळी 11.20 ला सुटणारी क्रमांक १८ ची वातानुकूलित बस क्रमांक MH 43 वक्ष 0402 ही उलवे /खारकोपर पर्यंत होती . या बसने दिनांक 23/12/2025 रोजी प्रवास करीत असताना ,बस चालकांकडून अनेकवेळा झटकन ब्रेक लावणे तसेच बस पुढे चालू ठेवताना अचानक झटका देवून बस चालविणे असा प्रकार लक्षात आला त्या मुळे शाळकरी मुलेमुली ,वयोवृध्द महिला व पुरुष .तसेच अन्य दिव्यांग प्रवासी जीव मुठीत धरून प्रवास करीत होते सदरच्या बस चालकांकडून अनेकवेळा प्रवासात बेजबाबदार पणे गाडी चालविल्या मुळे व कचकन ब्रेक लावल्याने अनेक उभे प्रवासी बस मध्ये एकमेकांच्या अंगावर पडले .व आसनावर बसलेले काही प्रवासी पुढच्या सीटवर तसेच खांबाला आदळले त्यात अनेक महिला ,लहान शाळकरी मुले आणि वयोवृध्द व दिव्यांग प्रवासी यांचा समावेश होता .सिग्नल च्या ठिकाणी पुढच्या रिक्षा व वाहनचालक याने अचानक ब्रेक लावून गाडी थांबविले असता हां प्रकार घडला असला तरी मोठा अपघात होण्याची व त्यात जीवितहानी होण्याची शक्यता होती वास्तविक पाहता रस्त्याने बस चालविताना दोन वाहनांच्या मध्ये नियमानुसार किमान अंतर ठेवणे हे प्रशिक्षण देताना वाहन चालकानं शिकविले जाते तसेच बस चालविताना वाहनचालकाने अन्य कोणाबरोबर गप्पागोष्टी न करता आपले लक्ष आजूबाजूला व पुढे मागे ठेवून बस नियंत्रित पणे चालविणे आवश्यक आहे परंतु बसचालक हा एका बस कंडक्टर सोबत गप्पा मारत बस चालवीत होता त्यामुळं लक्ष विचलित होत होते हे प्रवाश्यांच्या लक्षात आले त्याप्रसंगी एका महिला प्रवासी ने सदर बस चालकास ,नीट लक्ष देवून बस चालवीत जा ,आज अनेकजण एकमेकांच्या अंगावर पडले त्यात कोणाला किती दुखापत झाली आहे हे माहीत नाही अशी समज देत काल पण तुझा कडून असाच प्रकार घडला आहे असे दरडाऊन सांगितलं असता त्याने त्यांच्याशीच वाद घालायला सुरुवात केली ही बाब योग्य वाटली नसून यात बसचालक यांचे बेजबाबदार व बेशिस्त वर्तन ,अरेरावी पणा ,उद्धाम पणा निदर्शनास आला आहे .

तरी नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रम च्या प्रशासकीय यंत्रणेने याची गाम्बिर्याने दखल घेवून एनएमएमटी च्या सर्व वाहनचालकांना कडक व शिस्तबद्ध समज द्यावी जेणेकरून भविष्यात लहानमोठे अपघात होणार नाहीत

# नडगांव सेवा सोसायटी चेअरमनपदी अरुण पाटील तर व्हाईस चेअरमनपदी मंजुळाबाई हरड

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**(बातमीदार)**

**गोवेली :** कल्याण तालुक्यातील नडगांव सेवा सोसायटी चेअरमनपदी अरुण बाळु पाटील तर व्हाईस चेअरमनपदी मंजुळाबाई हरड बिनविरोध निवड. कल्याण तालुक्यातील नडगांव सेवा सोसायटी हि राजकीय दृष्ट्या महत्त्वाची समजली जाणारी सेवा सोसायटी असून नडगांव सेवा सोसायटी चेअरमनपदी अरुण बाळु पाटील तर व्हाईस चेअरमनपदी मंजुळाबाई हरड बिनविरोध निवड झाल्याबद्दल खडवली परिसरातून अभिनंदन केले जात आहे.नडगांव



सेवा सोसायटीत नडगांव,पिंताबरे गांव,चिंचवली,खडवली,वावेघर,वाल कस, बेहेरे या समावेश आहे.नडगांव सेवा सोसायटीच्या कमिटीवर १२ मेंबर्सची असून सोसायटीत ४३० सभासद आहेत.अरुण पाटील हे ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या उपाध्यक्षदी कार्यरत आहेत.नडगांव सेवा सोसायटीच्या चेअरमनपदी निवड झाल्याबद्दल कल्याण तालुक्यातुन अभिनंदन केले जात आहे.

# मतदारांच्या नावासमोरील स्टार * चिन्ह हटविण्यात येणार

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे (29) :** ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार यादीची पडताळणी करुन संभाव्य दुबार मतदारांची सखोल छाननी पूर्ण करण्यात आली आहे. या प्रक्रियेत एकूण 83,645 संभाव्य दुबार मतदारांची तपासणी करण्यात आली. मतदार यादी पडताळणीत 67071 मतदारांची नावे व फोटो एकमेकांशी जुळत नाहीत. अर्थात सदर मतदार 'दुबार मतदार' नाहीत. त्यामुळे या मतदारांच्या नावासमोरील स्टार (**) चिन्ह हटविण्यात येणार आहे. यामुळे या मतदारांना कोणत्याही अडथळयाविना मतदानाचा हक्क बजावता येणार असल्याची माहिती उपायुक्त (निवडणूक) उमेश बिरारी यांनी दिली. दरम्यान मतदार यादीत नाव व फोटो पूर्णतः समान असलेले 16,574 मतदार प्रत्यक्ष दुबार असल्याचे स्पष्ट झाले आहे. अशा मतदारांच्या नावासमोर स्टार (**) चिन्ह कायम ठेवण्यात येणार असून, सदर मतदारांच्या नावापुढे 'दुबार मतदार' असा शिक्का मतदार यादीत असणार आहे. अशा मतदारांना मतदान केंद्रावर विहित नमुन्यातील हमीपत्र लिहून देऊन मतदान करता येईल. दुबार मतदान टाळण्यासाठी त्यांच्यावर विशेष लक्ष ठेवले जाणार असल्याचेही त्यांनी नमूद केले. संबंधित मतदाराने आपण एकाच ठिकाणी आणि एकदाच मतदान करीत असल्याचे लेखी हमीपत्र दिल्यानंतर मतदानाची परवानगी देण्यात येणार असल्याची माहिती उपायुक्त उमेश बिरारी यांनी दिली

निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता राखणे, दुबार व बनावट मतदानास आळा घालणे तसेच पात्र मतदाराचा हक्क सुरक्षित ठेवणे, या उद्देशाने ही छाननी प्रक्रिया राबविण्यात आली आहे. मतदार यादी अचूक व दोषमुक्त असणे लोकशाहीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असल्याने, प्रशासनाकडून ही कार्यवाही काटेकोरपणे करण्यात येत आहे. या सुधारणांमुळे ठाणे महानगरपालिका निवडणूक अधिक पारदर्शक, विश्वासार्ह आणि सुरळीतपणे पार पडेल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.


# केडीएमसी क्षेत्रातील मांडा-टिटवाळा विभागातील नागरिक विविध नागरी समस्यांनी त्रस्त

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील कल्याण पश्चिम विधानसभा "अ" प्रभागातील मांडा-टिटवाळा विभागात गेल्या काही वर्षांपासून नागरिकांना मूलभूत नागरी सोयीसुविधांच्या अभावामुळे अत्यंत गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत आहे. वाढती लोकसंख्या, दुर्लक्षलेली पायाभूत सुविधा आणि प्रशासनाच्या अपुऱ्या लक्षामुळे येथील नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे.

विभागातील बहुसंख्य रस्ते अत्यंत खराब अवस्थेत असून अनेक ठिकाणी खड्ड्यांनी भरलेले आहेत. वाहतूक कोंडी, अपघात, आणि धुळीमुळे होणारे आजार हे नागरिकांच्या रोजच्या जीवनाचा भाग झाले आहेत. तसेच गटारे तुटलेली व अपूर्ण असल्यामुळे सांडपाणी रस्त्यावर वाहते, ज्यामुळे डेंग्यू, मलेरिया, त्वचारोग यांसारखे आजार फैलावत आहेत. लोकसंख्या वाढल्यामुळे पाण्याची टंचाई तीव्र झाली आहे. काळू नदीवरील विद्यमान बंधारा अनेक ठिकाणी तुटलेला असून पाण्याचा साठा टिकत नाही. या ठिकाणी नवीन बंधाऱ्याचे बांधकाम व नदीपात्राचे सुशोभीकरण केल्यास विभागातील पाण्याची समस्या कायमस्वरूपी दूर होईल आणि परिसराचे सौंदर्यही वाढेल.

विभागातील अनेक ठिकाणी रस्त्यांवर कचऱ्याचे ढिगारे पडलेले आहेत. त्यामुळे दुर्गंधी, डास, आणि रोगराईचे प्रमाण वाढले आहे. कचऱ्याजवळ मोकाट कुत्र्यांचे मोठे थवे निर्माण झाले आहेत. अलीकडेच टिटवाळ्यातील रिजेन्सी सर्वम परिसरात एका वयोवृद्ध महिलेवर कुत्र्यांच्या हल्ल्याने मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. त्यामुळे प्रशासनाने तात्काळ मोकाट कुत्र्यांवर नियंत्रण आणावे आणि नियमित कचरा संकलनाची प्रभावी व्यवस्था



करावी. टिटवाळा स्टेशन परिसरात अधिकृत पार्किंगची सुविधा नसल्यामुळे नागरिकांना रस्त्याच्या बाजूला वाहन उभी करावी लागतात. फेरीवाल्यांनी रस्त्यावर कब्जा केल्यामुळे वाहतूक कोंडी वाढते. त्यामुळे पूर्व-पश्चिम जोडणाऱ्या पुलाखालील मोकळया जागेत पार्किंग व भाजी मार्केटची व्यवस्था केल्यास वाहतुकीवरील ताण कमी होईल आणि शिस्तबद्धता निर्माण होईल.

नागरी समस्यांबाबत प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीश यांनाही निवेदनाद्वारे कळविण्यात आले आहे. तरीही प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देत नाही. मांडा-टिटवाळा विभागातील सर्व तातडीच्या नागरी समस्यांवर त्वरित आणि प्रभावी कार्यवाही करून नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा करण्याचे कार्य हाती घ्यावे, जेणेकरून मांडा टिटवाळा महापालिकेच्या स्मार्ट सिटी मधील विकसित शहर म्हणून नवा रुपात येईल.

**- किशोर शुक्ला**
**शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष**
**विधानसभा संघटक कल्याण पश्चिम**

टिटवाळा येथील इंदिरानगर स्मशानभुमी रस्ता विभागात शौचालय नाहीत, पिण्याच्या पाण्यासाठी मोठी 25 दशलक्ष लिटर पाणी टाकी नाही. रस्त्यावरील प्रचंड धुळ त्यामुळे श्वास घेण्यासाठी मोठा त्रास होत असुन आजारपण सुरूच आहे. रस्त्याची दुरवस्था असून रस्त्याच्या दोन्ही बाजूला गटार लाईन नाही, पिण्याचे पाणी नाही, स्पीड ब्रेकर नाहीत, गति दर्शविणारे फलक नाही, गतिरोधक नाहीत, गार्डन नाही, शासकीय रुग्णालय आणि रुग्णवाहिका नाही, सीसीटीव्ही कॅमेरे नाहीत. बऱ्याच चाळीतील पायवाट ठिकाणी पथदिवे नाहीत अशा असंख्य समस्याचा पाठपुरावा कल्याण डोंबिवली महानगरपालिका कडे केला आहे. **- गणेश भाटे**
**अध्यक्ष संघर्ष रहिवासी संघटना इंदिरानगर**

**कल्याण ते टिटवाळा गणेश मंदिरपर्यंत कल्याण डोंबिवली परिवहन उपक्रमाची बससेवा सुरू झाल्यास नागरिकांना मोठा दिलासा मिळेल. रेल्वेवरील गर्दी कमी होईल आणि स्त्री-पुरुष नोकरीधारक व शालेय विद्यार्थ्यांसाठी प्रवास सोयीस्कर बनेल त्याचबरोबर महापालिकेचे उत्पन्न वाढेल. विभागातील अनेक ठिकाणी विद्युत वाहिन्या अत्यंत खाली लटकलेल्या असल्याने जीवितहानी होण्याची शक्यता कायम आहे. त्यामुळे तातडीने भूमिगत विद्युत जाळे टाकण्याची आवश्यकता आहे. मांडा टिटवाळा जवळपास दीड लाख लोकसंख्या असूनही या विभागात अद्ययावत सरकारी रुग्णालय नाही. किरकोळ आजारांपासून ते गंभीर उपचारांसाठी नागरिकांना कल्याण किंवा डोंबिवलीकडे जावे लागते. स्थानिक पातळीवर आधुनिक आरोग्य केंद्र उभारल्यास नागरिकांना दिलासा मिळेल. मुलांसाठी खेळाचे मैदान नसल्याने मुले रस्त्यावर किंवा गल्लीबोळात खेळण्यास भाग पडतात. यामुळे शारीरिक आणि मानसिक विकासावर परिणाम होतो. तसेच जेष्ठ नागरिकांसाठीही एक व्यवस्थित उद्यान व व्यायामासाठी जागा निर्माण करण्याची गरज आहे.**


जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा
मुंबई विद्यापीठाशी संलग्न
ADMISSION OPEN 2025-26
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE
UNDER GRADUATE: B.A. | B.Com. | B.Sc. CHEMISTRY | B.Sc. MATHS | BAF | BMS
POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY | M.Com. ADVANCED ACCOUNTANCY | M.A. MARATHI | M.A. ECONOMICS | M.A. SOCIOLOGY | M.A. HISTORY
Look forward to a BRIGHTER FUTURE
7038658191
9130580111

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृतिदिनानिमित्त वक्तृत्व स्पर्धेची विभागीय फेरी उत्साहात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** छत्रपती शिक्षण मंडळ, कल्याण संस्थेच्या सर्व माध्यमिक विभाग व कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृतिदिनानिमित्त आयोजित वक्तृत्व स्पर्धेची विभागीय फेरी ज्ञानमंदिर हायस्कूल, कल्याण (पूर्व) येथील शालेय सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या स्पर्धेत अभिनव विद्यालय (कल्याण), विवेकानंद संकूल (मराठी व इंग्रजी माध्यम), नूतन ज्ञानमंदिर, ज्ञानमंदिर हायस्कूल अशा एकूण पाच शाळांतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. इयत्ता ८वी, ९वी व १०वी मधील १५ विद्यार्थ्यांपैकी ३ विद्यार्थ्यांनी आपली वक्तृत्वकला, विचारांची स्पष्टता आणि सादरीकरणातील आत्मविश्वास यांच्या जोरावर अंतिम फेरीत प्रवेश मिळवला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक राहुल भालेराव होते. परीक्षक म्हणून डॉ. प्रेम जाधव व सहायक शिक्षक संजय वझरेकर यांनी अत्यंत सूक्ष्म व न्याय्य परीक्षण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नयना गवारी यांनी केले, तर आभार प्रदर्शन रूपाली गुजराथी यांनी केले. स्पर्धा यशस्वीते साठी सुधीर वंजारे, एस. के चौरे, प्रज्ञा अहिरे या सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारीवर्ग यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी शाळेचे विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वक्तृत्व स्पर्धेची अंतिम फेरी शनिवार, ३ जानेवारी २०२६ रोजी विवेकानंद संकूल, सानपाडा येथे होणार आहे.





# जिल्हाध्यक्ष चेतनसिंह पवार यांच्या नेतृत्वात काँग्रेस पक्ष स्थापना दिवस संपन्न !!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
**मुरबाड-प्रतिनिधी**

दि.२८ डिसेंबर २०२५ रोजी काँग्रेस पक्ष स्थापना दिवस जिल्हा व तालुका कमिटीच्यावतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करुन काँग्रेसभवन, मुरबाड येथे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह पवार यांच्या नेतृत्वात साजरा करण्यात आला. स्थापना दिनानिमित्त सर्व काँग्रेसप्रेमी मतदार बंधू-भगिनींना व तळमळीने पक्ष उभारणी साठी झटणाऱ्या सर्व नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते यांना यावेळी चेतनसिंह पवार यांनी शुभेच्छा दिल्या.

यावेळी किसानचे प्रदेश सचिव तुकाराम ठाकरे, जिल्हासरचिटणीस जयवंत पवार, युवक अध्यक्ष धनाजी बांगर, ओबीसी तालुकाध्यक्ष अनिल चिराटे, महिला तालुकाध्यक्ष संध्या कदम, तालुका सचिव भगवान तारमळे, परिवहन शहरअध्यक्ष संतोष लिहे, तालुका पदाधिकारी दिलीप ठाकरे यांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. काँग्रेस पक्षाचे ध्येय व विचारधारा उपस्थितांना यावेळी जेष्ठ नेते तुकाराम ठाकरे यांना समजावले व स्थापनेपासुन ते आजतागायत मुरबाड तालुक्याला जिल्हाध्यक्षपदाची संधी चेतनसिंह पवार यांच्या माध्यमातुन मिळाल्याबद्दल अभिनंदन केले.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या पंढरपूर शहराध्यक्षपदी शंकरराव कदम यांची निवड

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या पंढरपूर शहराध्यक्षपदी ज्येष्ठ पत्रकार शंकरराव कदम यांची सर्वानुमते निवड जाहीर करण्यात आली. रविवार दि. २८ डिसेंबर २०२५ रोजी भक्ती मार्ग येथील उंच विठोबा ह.भ.प.महेश महाराज नलवडे यांच्या मठामध्ये पत्रकार संघाच्या सन २०२६-२०२७ करिता नुतनं पदाधिकाऱ्यांची निवड पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष राजेंद्र कोरके पाटील यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आली.



यामध्ये पंढरपूर शहर व तालुका कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून यात तालुकाध्यक्षपदी रोहन नरसाळे, पंढरपूर शहर उपाध्यक्षपदी नितीन करंडे, शहर कार्याध्यक्षपदी प्रमोद भोसले, तर तालुका उपाध्यक्षपदी अतुल मोरे, तालुका कार्याध्यक्षपदी बाळासाहेब काशीद, संपर्कप्रमुखपदी स्वागत खपाले, सचिवपदी कुमार कोरे, प्रसिध्दी प्रमुखपदी विक्रम कदम यांची निवड करण्यात आली. यावेळी मार्गदर्शकपदी राधेश बादले-पाटील, रामदास नागटिळक यांची निवड करण्यात आली. यावेळी रविंद्र कोळी यांच्यासह विविध पत्रकार उपस्थित होते.

या निवडीनंतर पंढरपूर शहराध्यक्ष शंकरराव कदम म्हणाले की, २०२६-२०२७ या सालाकरिता माझी निवड करण्यात आली याबद्दल मी सर्वांचे आभार मानतो. मी शहराध्यक्ष या नात्याने पत्रकारांच्या अडी अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्न करणार असून शासनाच्या विविध योजनेचा लाभ पत्रकार बांधवांना मिळविण्यासाठी देखील कार्य करणार आहे असे त्यांनी सांगितले.

# अंबरनाथ गोळीबार प्रकरणातील आरोपी अद्यापही मोकाट !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ :** ऐन निवडणुकीच्या काळात शिवसेनेतून भाजपा मध्ये प्रवेश केलेल्या भाजपा उमेदवार पवन वाळेकर यांच्या कार्यालयावर मंगळवारी 16 डिसेंबर रोजी मध्यरात्री दुचाकीवरून आलेल्या दोघा अज्ञाता कडून चार राऊंड फायर करण्यात आले होते. यावेळी पवन वाळेकर आपल्या कार्यालयातच होते. सुदैवाने या गोळीबार हल्ल्यातून नते ते सुखरूप बचावले. मात्र गोळीबार करणारे आरोपी अद्याप फरार असल्याने पोलिसांचे हात रिकामेच आहेत. अंबरनाथ मधील पवन वाळेकर व त्याचे काका अरविंद वाळेकर यांच्यातील वाद टोकाला गेला आहे. यातूनच पवन यांचे तिकीट शिवसेनेतून कापण्यात आल्याने त्याने ऐन निवडणुकीत भाजपा मध्ये प्रवेश केला. पवन यांना भाजपा ने त्याच प्रभाग क्रमांक चार मधून उमेदवारी दिली. त्यामुळे अरविंद वाळेकर यांचा मुलगा निखिल वाळेकर व पवन वाळेकर हे दोघे सख्खे चुलत भाऊ एकमेकांच्या विरोधात निवडणूक रिंगणात होते. त्यामुळे हा प्रभाग संवेदनशील झाला होता. त्यातच 16 डिसेंबर रोजी पवन त्याच्या नवीन भेंडीपाडा परिसरातील कार्यालयात बसले असताना त्यांच्या कार्यालयावर अज्ञात दुचाकीवरील दोघांनी पवन वाळेकर यांच्या कार्यालयावर बेशूट गोळीबार केला. या हल्ल्यात पवन सुखरूप बचावले. या गोळीबाराने मात्र या परिसरात तणावाचे वातावरण होते. गोळीबार करताना मारेकरी सीसीटीव्ही मध्ये कैद झाल्याने पोलीस त्यांना तात्काळ अटक करतील अशी अपेक्षा होती. मात्र तब्बल दहा दिवसानंतर देखील आरोपी पोलिसांच्या हाताला लागले नाहीत. त्यामुळे पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. पोलीस अधिकारी मात्र तपास सुरू आहे. इतकेच बोलत आहेत.

# शेई येथील ह. भ. प. कै. गोपाळ आलो तारमळे यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
**शहापूर ग्रामीण**
**(नरेंद्र पाटील)**



शहापूर तालुक्यातील शेई या गावातील गांधीजींच्या विचारसरणीशी एकनिष्ठ असणारे व शेई विद्यालयाचे माजी चेअरमन ह. भ. प. कै. गोपाळ आलो तारमळे यांचे वयाच्या 91 व्या वर्षी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले त्यांच्या निधनाने शेई गावावर शोककळा पसरली आहे. कै. गोपाळ तारमळे यांचा जन्म शेतकरी कुटुंबात झाला असून लहानपणापासूनच त्यांनी अतिशय कष्टमय जीवन व्यथीत केले त्यांच्याकडे येणारा गोरगरीब माणूस हा कधीच रिकाम्या हाताने परतला नाही त्यांचा स्वभाव अतिशय शांत व संयमी होता आपल्या घरी आलेल्या प्रत्येकाचा मानसन्मान त्यांच्याकडून केला जात असे आपले कष्टमय जीवन जगता जगता त्यांनी आपल्या एकत्रित कुटुंबातील पुतणे, नातू यांच्यावर योग्य संस्कार करून, चांगल्या सवयी रुजवून त्यांना योग्य त्या मार्गाला लावले. त्यांना समाजसेवेची आवड असल्यामुळे आपल्या गावाचा चांगला विकास कसा करता येईल याकडे त्यांनी सातत्याने लक्ष दिले त्यांच्या या समाज कार्यामुळे अतिशय प्रतिष्ठित व्यक्ती म्हणून गाव, समाज नातेवाईक त्यांना ओळखत होते. अशा या गांधी विचारसरणीच्या व्यक्तिमत्वाला नाना म्हणून ते सर्वांना सुपरीचीत होते सुपरीचीत होते. अशा या प्रेमळ व शांत स्वभावाच्या नानांचे शुक्रवार दिनांक 26/ 12/ 2025 रोजी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले त्यांच्या या निधनाने शेई गावावर शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होते त्यांच्या अंत्ययात्रेला वासिंद व परिसरातील नव्हे तर ठाणे जिल्ह्यातील विविध शैक्षणिक, अध्यात्मिक व राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर व मोठा जनसमुदाय उपस्थित होता. त्यांच्या पश्चात दोन विवाहित मुले एक विवाहित मुलगी, नातू पुतणे सुना, जावई, नात जावई, नात सुना असा मोठा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी रविवार दिनांक 04/01/2026 रोजी किन्हवली येथील संगमेश्वर तीर्थक्षेत्री होणार आहेत व उत्तरकार्य विधी बुधवार दिनांक 07/01/2026 रोजी शेई येथील राहत्या घरी होणार आहेत.



# भिवंडीत शाळकरी विद्यार्थ्यांकडून गल्लीबोळात मतदान जनजागृती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
**भिवंडी ( प्रतिनिधी )**

भिवंडी शहर महानगर पालिका सार्वत्रिक निवडणूक सुरळीतपणे पार पडावी यासाठी पोलीस व महापालिका प्रशासन सुसज्ज पद्धतीने कामकाज करीत आहेत.निवडणूक निमित्ताने मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी पालिकेच्या स्वीप कक्षमार्फत मतदान जनजागृतीसाठी विशेष मोहीम सुरू करण्यात आली असुन त्यास उत्तम प्रतिसाद मिळत आहे. भिवंडी महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी अनमोल सागर,अतिरिक्त आयुक्त नयना ससाणे व स्वीप कक्षाचे नोडल अधिकारी श्रीकांत परदेशी यांचे मार्गदर्शनाखाली सहाय्यक नोडल अधिकारी श्रीम.कल्पना तळपाडे व राहुल नाडेकर यांच्या उपस्थितीत शहरातील

टेमघर येथील पालिका शाळा क्रमांक ४४ च्या विद्यार्थ्यांनी टेमघर गावामध्ये गल्लीबोळातून रॅली काढुन परिसरातील नागरीकांना १५ जानेवारी रोजी मतदानाला चला असे नारे देऊन नागरीकांमध्ये मतदानाची जनजागृती केली.यावेळी शाळेच्या मुख्यध्यापीका प्राजक्ता प्रदीप परब,शिक्षक प्रमोद सुर्यवंशी, सत्यनारायण गोलापेल्ली,सुनिल बोंबेरे,राजेंद्र साळवे,संजय गोदके यांनी या साठी विशेष मेहनत घेतली.

# मोहम्मद रफी यांच्या जन्मदिनाच्या औचित्याने चित्रपट गीतांचा रंगारंग कार्यक्रम संपन्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** दृष्टीहीन गायक शफाक जाफरी याने सादर केलेली तेरी आँखोके सिवा दुनिया मे रखा क्या है, चुरा लिया है, छुप गए सारे नजारे, कितना प्यारा वादा है, डफली वाले ही एकाहुन एक सरस गाणी, तसेच जुगल किशोर, जय कुमार, सी एम जोशी, प्राजवता चौबळ, अरुणा हेगडे, इति कार या तयारीच्या गायकांनी गायिलेल्या सुरेल गीतांनी रसिकांना तृप्त केले.ज्येष्ठ दिवंगत गायक मोहम्मद रफी यांच्या १०१ व्या जन्मदिनाचे औचित्य साधून विष्णुदास भावे नाट्यगृहात पद्मावती एन्टरटेन्मेट प्रस्तुत दिवाना मुझसा नही या मोहम्मद रफींच्या गीतांचा समावेश असलेल्या चित्रपट गीतांच्या रंगारंग कार्यक्रमाचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते.

हिंदी चित्रपट सृष्टीचा सुवर्णकाळ मानल्या जाणाऱ्या कालखंडातील एकाहुन एक सरस युगुल गीते, एकल गीते, कव्वाली यावेळी रसिकांना ऐकायला मिळाली. वाद्यवृंदांचे युग काहीसे लोप पावत चाललेल्या सद्यस्थितीत या गाण्यांचे बहारदार आणि रससशीत सादरीकरण रसिकांना सुखावून गेले. यावेळी दृष्टीहीन गायक शफाक जाफरी यांना आर्थिक मदतीचे आवाहन आयोजक प्रदीप नायर यांनी केले असता त्यास गीतरसिकांना चांगला प्रतिसाद दिला. विशाल सपकाळ यांच्या संगीत संयोजनाची उत्तम साथ गण्यांना लाभल्याने कार्यक्रमास आणखी रंगत भरल्याचे मत गानरसिकांनी व्यक्त केले. लवकरच नवी मुंबई व पनवेल येथे आणखी प्रयोग करणार असल्याचे नायर यांनी यावेळी घोषित केले.

# नूतन वर्षानिमित्त मध्य रेल्वेवर चार विशेष लोकल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** नववर्षानिमित्त मध्य रेल्वेवर कल्याण, पनवेलसाठी न्यू इयर स्पेशल 4 विशेष लोकल धावणार आहेत. नवीन वर्ष आणि मुंबईतील समुद्र किनारे म्हणजे मुंबईतल्या व मुंबई बाहेरील नागरिकांसाठी खरच जुने व घनिष्ट संबंध मानले जाते. याच नव वर्षाच्या रात्रीची धामधूम अनुभवण्याकरिता मुंबई बाहेरच्या शहरांमधले नागरिक कुटुंबासह वर्ष अखेरीस रात्री मुंबईच्या दिशेने धाव घेत असतात. या नागरिकांच्या सोयीखातर मध्य रेल्वे प्रशासनाने नवीन उपाययोजना केली असल्याचे सूत्रांद्वारे सांगण्यात आले आहे. चालू वर्षाच्या अखेर रात्री मुंबईत प्रवास करणाऱ्या नागरिकांसाठी व मुंबईतून नव वर्ष साजरी करून परतीचा प्रवास करणाऱ्या नागरिकांसाठी 31 डिसेंबर रोजी 4 विशेष लोकल सेवा मध्य आणि हार्बर रेल्वे मार्गावर रवाना करण्यात येणार असल्याची माहिती मध्य रेल्वे प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे.

# डोंबिवली मधील तरुणांची राज ठाकरे आणि मनसेला पसंती

## शेकडो तरुणांचा मनसेमध्ये प्रवेश



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** भाजप आणि शिवसेनेच्या फोडाफोडीच्या राजकारणाला तरुण कंटाळले असून त्यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि त्यांच्या पक्षाला पसंती दिली आहे आणि शेकडो तरुणांचा मनसेमध्ये प्रवेश.. मनसेचे माजी नगरसेवक यांनी काही दिवसांपूर्वी शिवसेना आणि भाजपामध्ये प्रवेश केला यानंतर मनसे गळती लागली होती यानंतर मनसेचे नेते राजू पाटील भाकरी फिरवत शहरांमधली पद बदलली. याचाच परिणाम आता दिसून आला असून मनसेमध्ये आज शेकडो तरुण आणि तरुणींनी विद्यार्थी सेनेत प्रवेश केला आहे. दरम्यान येत्या निवडणुकीत ठाकरे बंधूंना आमचा पाठिंबा असेल असे प्रवेश केलेल्या तरुणांनी आपल्या भाषणात सांगितले.सदर पक्ष प्रवेशाच्या वेळी मनसे कल्याण लोकसभा सचिव राहुल कामत, विद्यार्थी सेना जिल्हाध्यक्ष धनंजय गुरव, डोंबिवली शहर अध्यक्ष मनोज घरत, विद्यार्थी सेना शहराध्यक्ष प्रतीक देशपांडे, उपजिल्हाध्यक्ष दीपेश नाईक, प्राजक्ता देशपांडे, चिराग ठक्कर, निधीश नायर आधी उपस्थित होते. तसेचं या पक्ष प्रवेशावेळी तरुणांच्या पालकांनी सुद्धा प्रवेश केला आहे..

# स्क्रा फाउंडेशनच्या एकदिवसीय कलाविकास कार्यशाळेला विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसाद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** इस्क्रा फाऊंडेशन ही संस्था शिक्षण, आरोग्य, महिला सबलीकरण, पर्यावरण संवर्धन तसेच समाज विकास या क्षेत्रांमध्ये कार्यरत आहे. समाजातील सर्व घटकांना एकत्र आणून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच ज्ञानवृद्धीसाठी संस्था सातत्याने प्रयत्नशील आहे, असे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष हरिश्चंद्र देसले यांनी सांगितले. इस्क्रा फाऊंडेशन अंतर्गत कला विकास कार्यशाळा हा उपक्रम महाराष्ट्रातभर राबविण्यात येत आहे. या कार्यशाळेच्या माध्यमातून मुलांमधील संगीत, वक्तृत्व, नाटक, कथाकथन अशा



विविध कला प्रकारांतील आवड व कौशल्यांना प्रोत्साहन दिले जाते. हा उपक्रम शहापूर तालुक्यातील कोठारे गावातील शासकीय माध्यमिक आश्रमशाळेत पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात आला. यामध्ये पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी कला विकास कार्यशाळेच्या संस्थापिका प्रणाली कदम यांनी मार्गदर्शन केले. मुलांमधील कला वेगवेगळ्या स्वरूपाच्या असतात, त्या ओळखून त्यांना योग्य वाव दिला पाहिजे, असे त्यांनी सांगितले. तसेच इस्क्रा फाउंडेशनचे डायरेक्टर चेतन कांबळे यांनीही आपले मत व्यक्त केले. सोपान मस्के यांनी यांनी संगीत बाबत मार्गदर्शन करताना, गायनाची आवड जोपासण्या बरोबरच सूर, ताल व लय योग्य पद्धतीने लावण्याचे महत्त्व स्पष्ट केले. शुभम जाधव यांनी नाटक व पथनाट्य याविषयी मार्गदर्शन केले. सचिन वीर यांनी कथाकथन बाबत विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला. त्याचबरोबर इस्क्रा फाउंडेशनचे संस्थापक हरीश्चंद्र देसले यांनी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसोबत ताणतणाव व्यवस्थापन या विषयावर संवाद साधत, ताण निर्माण होण्याची कारणे व ताण दूर करण्याच्या उपाययोजना सांगितल्या, अशी माहिती संस्थेच्या शहापूर प्रकल्प व्यवस्थापक श्वेता पाटील आणि अक्षय लखांबरे यांनी दिली. पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांसोबत खेळ, गाणी घेण्यात आली या उपक्रम मध्ये शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. गीता आढाव, राहुल बनसोडे, नेहा भोसले, अस्मिता कहाळे, अर्पिता पिळणकर हे कार्यकर्ते प्रत्यक्षात उपस्थित राहिले तसेच अप्रत्यक्षरित्या या उपक्रमात, प्रतीक जगताप, डॉ.अजित कांबळे, वर्षा वालकोळी,प्रतीक भालके,अमित जाधव,चैतन्य देसाई हे सदस्य सुध्दा सहभागी झाले असल्याची माहिती फाउंडेशनच्या सचिव प्रगती कांबळे यांनी दिली. हा उपक्रम घेण्याची संधी पंढरीनाथ वेखंडे यांनी दिली. तसेच मुख्याध्यापक अनंता फर्डे आणि आश्रमशाळेतील पवार, उज्वला देसले, पाटील तसेच शाळेतील सर्व शिक्षक उपस्थित राहून त्यांनी उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# प्रजापिता ब्रम्हकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय मुरबाड तर्फे आरोग्य शिबिराचे आयोजन!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड शहरातील खुले नाट्यगृह येथे गेले चार दिवस प्रजापिता ब्रम्हकुमारी ईश्वरीय विद्यालय मुरबाड शाखेतर्फे 25 ते 28 डिसेंबर असे चार दिवस हेल्थ-वेल्थ असा आनंद मेला संप्पन्न होत आहे. यामध्ये योगा, प्राणायाम, ध्यान अभ्यास, काऊन्सलिंग, माईड स्पा, स्ट्रेस चेकिंग, लेझर शो, व्यसनमुक्ती भारत अभियान, महिलांसाठी हळदीकुंकू, याच बरोबर रविवारी मोफत मेडिकल चेकअप कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुरबाड



शहरातील ख्यातनाम सर्जन डॉ. पारधी यांच्यासह अनेक डॉक्टर्स सहभागी झाले होते. यामध्ये डेंटल, कॅन्सर स्क्रीनींग, नेत्र तपासणी, स्कीन चेकअप, ब्लड शुगर, बी. पी. ईसीजी, स्रिरोग तज्ञअशा आजारांचे मोफत चेकअप करून औषधे देण्यात आली. या चार दिवशीय संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन प्रजापिता ब्रम्हकुमारी ईश्वरीय विद्यालय मुरबाडच्या वैशाली दिदी व त्यांच्या सर्व सहकार्यांनी केल्या बद्दल समस्त मुरबाड करांनी त्यांच्या या ईश्वरीय कार्याचे कौतुक केले असून कार्यक्रमास अनेक मान्यवरांनी भेटी दिल्या.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024